जळगाव- दि.७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणातील काही जागांसाठी उद्या रविवार दिनांक ८ जानेवारी रोजी जळगाव, धुळे, नंदुरबार या तीन जिल्ह्यांतील १९ मतदान केंद्रातील २५ बुथवर मतदान होत असून शनिवारी विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी मतदानाचे साहित्य घेवून मतदान केंद्राकडे रवाना झाले. या निवडणूकीसाठी विद्यापीठ प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे.

व्यवस्थापन प्रतिनिधी, महाविद्यालयीन अध्यापक, प्राचार्य आणि विद्यापीठ अध्यापकांच्या गटातून अधिसभेसाठी तसेच विद्यापरिषद आणि काही अभ्यास मंडळे यासाठी ही निवडणूक होत आहे. शनिवारी सकाळी विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यातील मतदान केंद्रांकडे साहित्यासह वाहनाने रवाना झाले. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी या वाहनांना झेंडी दाखविली. कुलसचिव डॉ. विनोद पाटील, निवडणूक विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील, डॉ. मुनाफ शेख, निवडणूक विभागीय अधिकारी जी. एन. पवार, एस. आर. गोहिल, डॉ. दिनेश पाटील, इंजि. एस. आर. पाटील, के. सी. पाटील, ए. सी. मनोरे, व्ही. व्ही. तळेले आदी यावेळी उपस्थित होते. मतदान प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी विद्यापीठाने जय्यत तयारी केली असून विभागीय अधिकारी, केंद्र अध्यक्ष, मतदान अधिकारी व मतदान सेवक अशा एकुण १८२ जणांच्या नेमणूका केल्या आहेत. १९ केंद्रामध्ये २५ बुथची व्यवस्था मतदानासाठी करण्यात आली आहे.

मतदान केंद्र पुढीलप्रमाणे आहेत -

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव., मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव, नाहाटा महाविद्यालय, भुसावळ., श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय, रावेर, प्रताप महाविद्यालय, अमळनेर, डि एस. पाटील महाविद्यालय, एरंडोल., एम. एम. महाविद्यालय, पाचोरा, बी. पी. कला, एस. एम. ए. विज्ञान व के. के. सी. वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगांव, झेड बी. महाविद्यालय, धुळे, व्ही. व्ही. एम संस्थेचे महाविद्यालय, साक्री, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनगीर, जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार, ए. एस. एस. एस. संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, पुज्य साने गुरूजी विद्याप्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा, एस. पी. डी. एम. महाविद्यालय, शिरपूर, एस. एस. व्ही. पी. एस. संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, शिंदखेडा, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळोदा.

व्यवस्थापन परिषदेच्या गटामधून खुला संवर्गातील ४ जागासाठी ६ उमेदवार, महाविद्यालयांच्या अध्यापकांमधून ५ खुल्या संवर्गासाठी १४ उमेदवार आहेत, प्राचार्यांमधून ५ खुल्या संवर्गासाठी ७ उमेदवार, विद्यापीठ अध्यापकांच्या गटामधून खुला संवर्गातील १ जागेसाठी ३ उमेदवार, अनुसुचित जमाती संवर्गासाठी १ जागेसाठी २ उमेदवार आणि महिलांसाठी राखीव असलेल्या १ जागेसाठी २ महिला उमेदवार अधिसभेसाठी रिंगणात आहेत. विद्यापरिषदेच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील खुला संवर्गासाठीच्या १ जागेसाठी ३ उमेदवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या खुला संवर्गाच्या १ जागेसाठी २ उमेदवार, मानव्य विद्याशाखेच्या खुला संवर्गासाठीच्या १ जागेसाठी २

उमेदवार आणि इतर मागासवर्ग संवर्गातील १ जागेसाठी २ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. १३ अभ्यास मंडळासाठी देखील निवडणूक होणार आहेत. उद्याच्या निवडणूकीत ५७ विद्यापीठ अध्यापक, ५७ प्राचार्य, १८१४ संलग्न महाविद्यालय व परिसंस्थेचे अध्यापक आणि ८४ व्यवस्थापन प्रतिनिधी हे मतदानाचा हक्क बजावणार आहेत. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. विनांद पाटील यांनी दिली.

दरम्यान विद्यापीठाने निवेदन प्रसिध्दीला दिले असून यामध्ये म्हटले आहे की, मतदान प्रक्रिये संदर्भात सर्व सुचना विद्यापीठाने www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या आहेत. मतदान प्रक्रियेबाबत महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले एकरूप परिनियम क्र.१/२०१७ दि. १७ मे २०१७ मधील तरतुदींनुसार व त्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी २०२२ मधील विद्यापीठ प्राधिकरण निवडणुकांसाठी जाहीर केलेल्या सुचना / निदेशाप्रमाणे मतदान करावयाचे आहे. याव्यतिरिक्त मतदान कसे करावे याबाबत विद्यापीठाने कोणत्याही प्रसार / समाज माध्यमाव्दारे चित्रफित निर्गमित केलेली नाही याची सर्व संबंधित मतदार व उमेदवारांनी नोंद घ्यावी असे या निवेदनात म्हटले आहे.

.........................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ७ जानेवारी, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी